**ठळक बातम्या**

- राज्यघटनेतली मूलभूत तत्वं आणि मूलभूत अधिकारांचा एकत्र विचार करून सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी काम करण्याचं सरन्यायाधीशांचं आवाहन

- राज्यातल्या गिग वर्कर्सना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याचं राज्य सरकारचं आश्वासन

- विधानसभेतल्या विरोधी पक्षनेतेपदाच्या मुद्द्यावरुन विरोधक पुन्हा आक्रमक, सरन्यायाधीशांना निवेदन

आणि

- राज्याच्या विविध भागात पाऊस, विदर्भात जनजीवन विस्कळीत

**<><><><>**

भारतीय राज्यघटनेतली मूलभूत तत्वं आणि मूलभूत अधिकार हे घटनेचा आत्मा आहेत, या दोन्हींचा एकत्र विचार करून सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी काम केलं पाहिजे, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात उपस्थितांना संबोधित करत होते. कुठल्याही पदासोबत जबाबदारीही येते आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक असलेल्या मला सरन्यायाधीश पदाची जबाबदारी मिळाली ही अभिमानाची गोष्ट आहे असं ते म्हणाले.

- **होल्ड - सरन्यायाधीश बाइट -**

यावेळी त्यांनी राज्य घटनेमागची बाबासाहेबांची भूमिका उपस्थितांना समजावून सांगितली. घटना दुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही याचा पुनरुच्चार त्यांनी केला. युद्ध आणि संकटाच्या काळात भारतीय राज्य घटनेनं देशाला जोडून ठेवलं, असंही त्यांनी सांगितलं.

भाषणाआधी न्यायमूर्ती गवई यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. व्यापक जनहितासाठी गवई यांनी कायद्याचा वापर केला असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. पहिल्यांदाच

सरन्यायाधीशांचा सत्कार विधान भवनात होत असल्याची प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली. तर हा सत्कार ऐतिहासिक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. हा सत्कार म्हणजे राज्यातल्या जनतेचा आशीर्वाद असल्याची प्रतिक्रिया न्यायमूर्ती गवई यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या सत्काराच्या पूर्वी दोन्ही सभागृहात त्यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमतानं मंजूर करण्यात आला.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचं गठन, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाचं गठन, तसंच महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था प्रवेश आणि शुल्क विनियमन सुधारणा, ही विधेयके सभागृहात मंजूर करण्यात आली

मुंबई उपनगरातल्या शासकीय जमिनींवर झालेल्या अतिक्रमणाची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत केली.

राज्य सहकारी दूध महासंघातल्या भविष्य निर्वाह निधीमधल्या गैरव्यवहार प्रकरणाचा तपास सीबीआयकडून सुरू असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सुरुवातीला काही तांत्रिक अडचणी आल्या, मात्र आत्तापर्यंत पाच लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचं महाविद्यालय मिळालं असून कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत दिली.

**<><><><>**

राज्यातील झोमॅटो, स्विगी अशा प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या गिग वर्कर्सची संख्या भविष्यात वाढणार असून, सरकार त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदे निर्माण करणार असून, त्याच्या मसूद्यावर सध्या काम सुरू असून, त्याद्वारे या कामगारांना सामाजिक सुरक्षा

देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विरोधी पक्षांनी, नियम २६० अन्वये मांडलेल्या ठरावाला उत्तर देतांना दिली.

संघटित कामगारांपेक्षा, असंघटित कामगारांची संख्या वाढलेली असून, त्यांच्या कल्याणाकरता राज्यात ६८ व्हर्चुअल बोर्डची रचना प्रस्तावित असून त्या दिशेने त्यांची नोंदणी, त्यांची सामाजिक सुरक्षा यांचा विचार करुन त्यांना न्याय देण्यासाठी काम सुरू असल्याची माहिती, फुंडकर यांनी दिली.

<><><><>

विधानसभेतल्या विरोधी पक्षनेत्याचा मुद्दा विरोधी पक्षांनी आज पुन्हा उपस्थित केला. न्यायमूर्ती गवई यांचा सत्कार समारंभाच्या कार्यक्रम पत्रिकेत विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्याचा उल्लेख नसल्याचा मुद्दा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. यावर, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, नवीन विधानसभेच्या स्थापनेनंतर विरोधी पक्षनेत्याच्या निवडीसाठीचा प्रस्ताव यायला चार महिने लागले, त्यावर निर्णय घ्यायला सुमारे तीन महिने लागणं ही काही मोठी बाब नाही, असं मत व्यक्त केलं. यावर विरोधकांनी थोडा गदारोळ केला. त्यानंतर अध्यक्षांनी लक्षवेधी सूचना पुकारल्या.

विधानसभा अध्यक्षांकडून विरोधी पक्षनेत्याची निवड अद्याप झाली नसल्याची बाब सरन्यायाधिशांच्या निदर्शनाला आणून देण्यासाठी महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळानं त्यांना आज याबाबत निवेदन दिलं.

विरोधी पक्ष नेता हे घटनात्मक पद असताना त्यावर निर्णय न घेणं ही देखील घटनेची पायमल्ली आहे, असं या निवेदनात म्हटलं आहे. याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं…

**होल्ड - बाईट - आदित्य ठाकरे**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीच्या मुद्द्यावरही लवकर निकाल देण्याची अपेक्षा त्यांनी सरन्यायाधीशांकडे यावेळी व्यक्त केली.

<><><><>

राज्यात अनेक जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरु आहे.

**भंडारा** जिल्ह्यात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे पूराची शक्यता लक्षात घेत १८ रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. तसंच, शाळा आणि महाविद्यालयांना आज आणि उद्या सुट्टी देण्यात आली आहे.

**गोंदिया** जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून वैनगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. काल दिवसभर झालेल्या पावसामुळे तिरोडा तालुक्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. पावसामुळे जिल्ह्यातले २१ मार्गांवरची वाहतूक ठप्प झाल्यानं विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आज सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली होती.

**गडचिरोली** जिल्ह्यातही रात्रीपासून संततधार पाऊस सुरु असून, नद्या- नाल्यांना पूर आल्यानं १६ मार्गांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. दरम्यान गोसेखुर्द धरणातून होणार पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्यानं वाढवण्यात येणार आहे. त्यामुळे नदीकाठवरच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात मालवणच्या समुद्रात मासेमारीसाठी गेलेली नौकेला झालेल्या अपघातात एक मच्छीमार बेपत्ता झाला. जोरदार वाऱ्यापावसानं ही नौका उलटून त्यावरचे तीन मच्छीमार पाण्यात फेकले गेले. दोघांना वाचवण्यात आलं तर स्थानिक मच्छीमार आणि एनडीआरएफ पथकाकडून समुद्रात तिसऱ्याचा शोध सुरु आहे.

पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं असलं तरीही **रत्नागिरी** जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकरी सुखावले असून शेतीच्या कामांना वेग आला आहे.

**सोलापूर** जिल्ह्यात उजनी धरण क्षेत्रात जोरदार पाऊस होत असल्यामुळे धरणात ८७ टक्क्याहून अधिक पाणीसाठा झाला आहे. या साठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्यानं पूर नियंत्रणासाठी उजनी धरणातून भिमा नदीत पाणी सोडण्याचा निर्णय उजनी धरण व्यवस्थापनानं घेतला आहे. त्यामुळे भिमा नदी काठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**<><><><>**

अनुसूचित जातीतल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्तेवर प्रवेश आणि नोकऱ्या मिळवण्याचा प्रयत्न करावा, आणि आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतल्या अधिक गरजू

युवकांना घेऊ द्यावा, असं आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते आज मुंबईत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ८० व्या वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते.

**//<><><><>//**